I J R S S I S, Issue (VIII), Vol. II, Jan 2023: 205-208

A Double-Blind Peer Reviewed Journal

OPEN ACCESS

e-ISSN 2347 – 517X

Original Article

Reg. No.: MH-NGP/0000167

INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES

© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# अण्णा हजारे यांच्या जनलोकपाल आंदोलनात माध्यमांची भूमिका

मिलिंद बळीरामजी भगत व सावधान वासुदेव उमक

डॉ.आंबेडकर महाविद्यालय, चंद्रपूर

*Corresponding Author :- milindbhagat95@gmail.com, sawadhanumak@gmail.com

| Communicated : 20.12.2022 | Revision : 12.01.2023<br>Accepted : 20.01.2023 | Published: 30.01.2023 |
|---|---|---|

**सारांश :**

आधुनिक काळात एखाद्या आंदोलनाच्या यशात प्रसार माध्यम व समाज माध्यमांची भूमिका महत्वाची ठरत आहे. माध्यमांचे महत्व ओळखून अण्णा हजारे यांनी जनलोकपाल आंदोलनाच्या प्रचार–प्रसाराकरीता अतिशय प्रभावीपणे वापर करुन आंदोलनास व्यापक स्वरुप दिले. टि.वी., वृत्तपत्रे, साप्ताहिक, मासिके या पारंपारिक प्रसार माध्यमांबरोबरच फेसबुक, ट्विटर, युट्यूब, इमेल, या नवीन समाज माध्यमांवरुनही मोजक्या शब्दात पण जलदगतीने संदेश लोकांपर्यंत पोहचविण्यात आले. भ्रष्टाचाराविरुध्दची लढाई अण्णांनी जशी रस्त्यावर येऊन लढली तशीच समाज माध्यमांवरुनही लढली. त्यामुळेच जास्तीत जास्त लोकं आंदोलनात सहभागी झाले. संपुर्ण देशभरात आंदोलनाचा विस्तार झाला. एरवी आंदोलनापासून दूर राहनारा मध्यम वर्गही रस्त्यावर उतरला आणि भारतीय राजकारणाला नवी दिशा मिळाली. अण्णाच्या आंदोलनास मिळणारे जनसमर्थन पाहून भारत सरकारनी अण्णाच्या मागण्या मान्य करुन उपोषण मागे घेण्याची विनंती केली. लोकपाल विधेयक तयार करण्यास सरकार तयार झाले. आंदोलनकाळात अण्णा आणि त्यांच्या सहका–यांनी प्रसार व समाज माध्यमांवरुन जो दबाव निर्माण करण्यात आला, त्याचाच तो परिपाक होता. देशाला माध्यमांच्या परिणामकारकतेची शक्ती कळली.

**मुख्यशब्द** : आंदोलन, उपोषण, भ्रष्टाचार, माध्यम, प्रभाव

## प्रस्तावना :

भारत संक्रमणकालीन अवस्थेतून जात आहे. यात जूनी मूल्ये मागे पडून नवीन मूल्ये रुजत आहेत. जे पुर्वी निंदनीय समजले जात होते तेच आता आवश्यक समजले जात आहे. त्यामुळेच येथे समाज माध्यम व प्रसार माध्यमांची भुमिका महत्वाची आहे. स्वत: अण्णा हजारे यांनी त्याची उपयुक्तता व परिणामकारकता मान्य केली आहे. ते अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे उत्तम मंच आहे. आपल्या आजूबाजूस घडणा–या प्रत्येक घटनेस लोकांसमोर आणण्याचे काम करते. जनमतावर प्रभाव पाडण्याची प्रचंड ताकद त्यात आहे. माध्यमांचे हे महत्व ओळखुन अण्णा आणि त्यांच्या सहका–यांनी आंदोलनाकरिता त्यांचा कुशलतेनी वापर करुन घेतला. माध्यमांवरुन आंदोलनाविषयी जागृकता वाढविण्यात आली. भ्रष्टाचाराच्या विरोधात सामान्य माणसाला एकत्र आणण्याचे काम केले. अण्णाचे उपोषण आणि जनमताच्या वाढत्या रेटयामुळे सरकारला त्यांच्या मागण्या मान्य करुन लोकपाल विधेयक तयार करण्यास राजी झाले. यात माध्यमांची भूमिका महत्वाची होती.

## उद्दिष्टे :

१. अण्णा हजारे यांच्या आंदोलनात प्रसार माध्यमांची भूमिका दर्शविने.

२. नवीन समाज माध्यमांचे आंदोलनातील योगदान स्पष्ट करणे.

४५ वर्षापासून संसदेच्या मान्यतेसाठी प्रलंबीत असलेल्या जनलोकपाल विधेयकासांठी तथा सक्षम लोकपालाच्या मागणीसाठी जेष्ठ गांधीवादी समाजसेवक अण्णा हजारे यांनी दिल्लीत उपोषण सुरु केले. पहिले उपोषण ५ एप्रिल २०११ ला जंतरमंतर मैदानावर केले तर दुसरे उपोषण १६ ऑगस्ट २०११ ला रामलीला मैदानावर केले. उपोषण सुरु करण्यापूर्वी तथा उपोषणकाळात आंदोलनाच्या प्रचार–प्रसाराकरीता अण्णा आणि त्यांच्या सहका–यांनी प्रसार माध्यम व समाज माध्यमांचा अतिशय कुशलतेनी वापर करुन घेतला. अल्पावधीत लक्षावधी लोकांपर्यंत

आंदोलनाची माहिती पोहविण्यात आली. माध्यमांमुळे हे आंदोलन तेवत राहीले. लोकांचा उत्साह टिकवून ठेवण्यात आला. माध्यमांवरुन मिळणा—या या अफाट प्रतिसादाकडे जनमताच्या कौलाचा एक भाग म्हणून पाहण्यात आले. माध्यमांनी स्विकारलेल्या भूमिकेमुळे संपुर्ण आंदोलनास गती मिळून परिवर्तनाच्या दिशेने पाऊल टाकण्यात मदत झाली. या काळात अण्णा आणि उपोषणास, त्यांच्या व्यक्तीमत्वास सर्वाधिक प्रसिध्दी मिळाली. त्यामुळे आंदोलनास नवी उर्जा मिळाली.

जनलोकपाल विधेयक मंजूर होईपर्यंत उपोषण करणार असल्याची घोषणा अण्णा हजारे यांनी करताच वृत्त वाहीण्यांचे लक्ष या आंदोलनाकडे वेधल्या गेले. टि.वी. वाहिण्यांनी आंदोलनाचे २४ तास प्रक्षेपन करुन मोठी प्रसिध्दी दिली. भ्रष्टाचाराचा मुद्दा प्रथमच मोठया गांभीर्याने माद्यमांनी आपल्या एजेंढयावर घेतला होता. अण्णाच्या आंदोलनास देशभरातून अभूतर्पुव पाठींबा मिळाला. जनता रस्त्यावर उतरुन सरकावरील आपला रोष व्यक्त करीत आहे हे दाखविण्यात टि.वी. वाहिण्या सफल झाल्या. आंदोलनाचे दृष्य टिपण्यासाठी प्रादेशीक व राष्ट्रीय स्तरावरील वृत्त वाहिण्या तत्पर राहत होत्या. अण्णा आणि त्यांच्या आंदोलनाशी संबंधीत प्रत्येक क्षणाचे चित्रण वृत्तवाहिण्या जनतेपर्यंत पोहचवित होत्या. उपोषणाच्या माध्यमातून अण्णा इतिहास घडवित होते. त्या इतिहासाच्या प्रत्येक क्षणाचे आपण साक्षीदार असले पाहिजे असे माध्यमांना वाटत होते. अण्णाचा प्रत्येक शब्द, देशभरात पोहचविल्या जात होता. भ्रष्टाचारविरोधी आंदोलनाची प्रेरक व्यक्ती ठरल्या होत्य उपोषण काळात अन्य बातम्या जवळ जवळ ब्लॅक आऊट झाल्या होत्या. अण्णा हजारे यांना भारतीय राजकारणाच्या केंद्रस्थानी आणन्यात प्रसार माध्यमांची भूमिका महत्वपुर्ण होती.

विश्वासार्ह माहितीसाठी जनता प्रसार माध्यम, समाज माध्यमावर अधिक विश्वास ठेवीत आहे. प्रसार माध्यमांमध्ये मुद्रीत माध्यमाची गणना विश्वसनीस व परिणामकारक म्हणून केली जाते. समाजातील सर्वच स्तरातील जनतेच्या हिताची जपणूक करण्यासाठी वेळोवेळी योग्य ती माहिती प्रकाशीत करीत असतात. त्यामुळेच अण्णा हजारे यांच्या आंदोलनात मुद्रीत माध्यमांचा नियोजनबध्द वापर करण्यात आला. आंदोलनकाळात याच बातम्यांना सर्वाधिक जागा देण्यात आली. भ्रष्टाचार व जनलोकपाल आंदोलनाकडे पाहण्याचा दृष्टीकोणच बदलला. भ्रष्टाचारविषयी लोकांच्या मनात असणारा तिटकारा आणि आंदोलनाविषयीची कुतूहलता यामुळे मुद्रीत माध्यमांनी आंदोलनास प्रसिध्दी दिली. यातून आंदोलनास बळ मिळाले.

द हिंदू, टाईम्स ऑफ इंडीया, इंडीयन एक्सप्रेस पीटीआय यासारख्या राष्ट्रीय स्तरावरील मुद्रीत माध्यमांनी अण्णाच्या आंदोलनास मोठी प्रसिध्दी दिली. इंडीया टूडे, आऊटलूक, टाईम्स यासारख्या साप्ताहीकांनीही आंदोलनाचे कवरेज केले. विश्वासार्ह माहिती, विश्लेषन, वैविध्यपुर्ण टिपण्या देण्याचे काम मुख्य प्रवाहातील मुद्रीत माध्यमांनी केले. भारतातील अग्रगण्य वृत्तपत्र म्हणून ओळखल्या जाणा—या द हिंदू या वृत्तपत्राने अण्णाच्या जनलोकपाल आंदोलनास मोठी प्रसिध्दी दिली. उपोषणाच्या समर्थनार्थ दिल्लीतील इंडीया गेटवर काढण्यात आलेल्या मोर्चास ठळक प्रसिध्दी दिली. ड्राईंग रुममध्ये बसून पाठींबा देणा—या मध्यम वर्गास रस्त्यावर उतरण्यास प्रेरीत केले. यामुळे भ्रष्ट राजकीय व्यवस्था हादरुन गेली. टाईम्स ऑफ इंडियाच्या दिल्ली आवृत्तीने भ्रष्टाचाराच्या विरोधात जनमत एकत्रीत करण्यात, तथा लोकपाल विधेयक निर्माण करण्यासाठी सरकारवर दबाव वाढविण्यात महत्वाची भूमिका बजाविली. या वृत्तपत्राने संपुर्ण आंदोलन काळात पहिल्या पानावर

आंदोलनास जागा दिली. भारतातील आघाडीची वृत्तसंस्था पीटीआय ने सामाजिक कार्यकर्ते अण्णा हजारे यांच्या जनलोकपाल लढयास प्रसिध्दी देण्यासाठी वृत्तांकन केले. आंदोलन तथा लोकपाल विधेयकाच्या वैधानिक बाजूची माहिती देऊन जनमत जागृत करण्याचे काम केले.

२०११ हे वर्ष, भारतात अण्णाचे वर्ष होते. त्यांच्या आंदोलनास, नियतकालीकांनीही महत्व दिले. इंडीया टूडे साप्ताहिकाने अण्णा हजारे यांच्या चळवळीसंबंधी म्हणतात, 'महाराष्ट्रातील राळेगणसिध्दीसारख्या छोटयाशा खेडयातील समाजसेवकाने अशावेळी भारतात आंदोलन सुरु केले, जेव्हा जनता जीवघेण्या कट्टरतेच्या मार्गावर होती. जनतेच्या मनात नैराश्याची भावना वाढीस लागली होती. देशात भ्रष्टाचाराची गटारगंगा वाहत असतांना नागरिक संतप्त झाल्याने अण्णांनी स्वत:ला आंदोलनात झोकून देऊन एका सामान्य नागरिकाप्रमाणे नेतृत्व केले'.

अमेरिकेच्या जगप्रसिध्द टाईम्स मॅगझीनने अण्णा हजारे यांच्या चळवळीच्या प्रभावाची दखल घेऊन २०११ च्या जगातील दहा प्रभावशाली व्यक्तीमध्ये अण्णाला स्थान देऊन त्यांच्या कार्याची दखल घेतली. पिटर हॅपकनी आपल्या फोटो संग्रहाच्या मुखपृष्ठावर अण्णा हजारे यांना स्थान देऊन 'भारतातील भ्रष्टाचार विरोधी लढयाचा योध्दा' असे त्या चित्राला शिर्षक देऊन गौरव केला.

नवीन समाज माध्यमांवरही अण्णाच्या आंदोलनाचे वर्चस्व होते. अण्णाच्या समर्थनार्थ अखंड प्रवाह चालू होता. इतर वेळेस वेगवेगळया विषयावर विचार मांडणारे नेटकरी आंदोलनकाळात फक्त अण्णाशी संबंधीत विचार मांडत होते. ही चळवळ जनतेस अंतर्मुख करणारी ठरली. फेसबुक, ट्विटर, युटयुब, एसएमएस, ब्लॉग या नवीन समाज माध्यमांवरुन देण्यात येणा—या संदेशांमुळे तरुणांचा, मध्यमवर्गीयांचा मोठा प्रतिसाद मिळाला. चळवळीची माहिती लोकांपर्यत पोहचविण्यासाठी नियोजनपूर्वक वापर केला. अण्णा हजारे यांच्या आंदोलनामुळे सोशल मिडीयाच्या नव्या शक्तीचा अनुभव भारतीयांना आला. फेसबुक या सोशल नेटवर्कींग साईटवरुन अण्णाच्या आंदोलनास सर्वात जास्त पाठींबा मिळाला. असाच पाठींबा ट्विटरवरही मिळाला. अण्णा आणि त्यांच्या आंदोलनाशी संबंधीत हॅशटॅग चालविण्यात आले. अण्णाच्या उपोषणाची माहिती तथा दिल्लीतील राजकीय घडामोडींच्या उत्सुकतेपोटी लोकं अण्णाला समाज माध्यमांवर फालो करीत होते. आंदोलनाची माहिती जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी इंटरनेट, मोबाईल फोन, एमएमएस, ई—मेल, मिस्ड कॉल, ब्लॉग या सारख्या सुविधांचाही वापर करण्यात आला. यूटयब वरुन आंदोलनाची सर्व माहिती लोकांपर्यंत पोहचविण्यात आली.

**निष्कर्ष :**

१. प्रसार माध्यम व समाज माध्यमामुळे अण्णाच्या आंदोलनाचा अल्पावधीच संपुर्ण देशभरात विस्तार झाला.

२. लोकपाल विधेयकाच्या निर्मितीसाठी भारत सरकारवर दबाव वाढविण्यात मदत केली.

३. अण्णा हजारे २०११ साली प्रसार माध्यम व समाज माध्यमावर भारतातील सर्वाधीत प्रभावशाली व्यक्ती होती.

**मूल्यमापन :**

अण्णा हजारे यांचे जनलोकपाल आंदोलन तथा उपोषण सर्वार्थाने ऐतिहासिक ठरले. सतत या चळवळीचे थेट प्रक्षेपण दाखवून इलेक्ट्रानिक मिडीयाने नवा उच्चांक गाठला. प्रिंट मिडीयाने सुध्दा अण्णाच्या चळवळीचे वृत्तांकन करुन प्रचार—प्रसारात मोलाची भूमिका बजाविली. सर्व प्रमुख वर्तमानपत्रांचे, साप्ताहिक मासिकांचे मथळे अण्णाच्या चळवळीशी संबंधीत होती. स्वातंत्र्यानंतर प्रथमच प्रसार माध्यमांमध्ये अशाप्रकारचे चित्र दिसले. संवादाचे प्रभावी साधन म्हणून पुढे आलेल्या सोशल मिडीयावरही अण्णा आणि त्यांच्या उपोषणाचाच प्रभाव होता.

चळवळीची सर्व माहिती जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी समाज माध्यमांचा नियोजनबध्द वापर करुन घेतला. या चळवळीच्या यशात समाज माध्यमांचा मोलाचा वाटा आहे.

**संदर्भ :**

बिजल धनंजय – अण्णा हजारे, मेहता पब्लि., हाऊस पुणे, २०१२

आशुतोष – ते तेरा दिवस, अक्षर प्रकाशन, मुंबई, २०१३

सोनवने अजय – आम आदमीची अण्णाक्रांती, विजय प्रकाशन सोलापूर – २०१३